स्थापना १९३९
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# लष्करी डावपेच, प्रशिक्षणातून नवे शिकण्याचा कंपन्यांचा कल



**पुणे :** युध्दभुमीवरच्या लष्करी डावपेचापासून तसेच सैन्यातून मिळणाऱ्या प्रशिक्षणापासून कंपन्यांतील अधिकाऱ्यांनाही बरेच काही शिकता येते, असा अनुभव आता कॉर्पोरेट वर्तुळाला येऊ लागला आहे. त्यामुळेच अशा पध्दतीचे प्रशिक्षण घेण्याकडे सध्या अधिक कल दिसून येत असल्याचे सदर्न कमांडचे माजी प्रमुख निवृत्त लेफ्टनंट जनरल रेमंड नऱ्होना यांनी सांगितले.

दहशतवादी हल्ल्यात आणि नैसर्गिक संकटात स्वत:चा आणि इतरांचा बचाव कसा करावा याचे लष्करातील अनुभवी जवान आणि अधिकाऱ्यांकडून प्रशिक्षण देण्याचा देशातील पहिला उपक्रम डेला ॲडव्हेंचर ट्रेनिंग ॲकेडमी( डीएटीए) ने सुरू केला असून त्यात कॉर्पोरेट ट्रेनिंगचाही समावेश आहे. डेला समुहाचे संस्थापक अध्यक्ष जिमी मिस्त्री यांनी लोणावळ्याजवळच्या या ॲकेडमीच्या रूपाने 'मिलिट्री टूरिझम' चा पाया घातला आहे . या प्रशिक्षण केंद्रात भारतीय सेना दलातील दहशतवादी विरोधी लढ्यात जीवाची बाजी लावणारे निवृत्त जवान, अधिकारी आणि ब्लॅक कॅट कंमाडो यांची नियुक्ती करण्यात आली असल्याने त्याचा लाभ इथे येणाऱ्यांना होतो. या ॲकेडमीचे नेतृत्व लेफ्टनंट जनरल नऱ्होना यांच्याकडे आहे.

अलिकडेच इथे 'गुगल' ची कॉर्पोरेट टीम प्रशिक्षणासाठी येऊन गेली. जिमी मिस्त्री आणि लेफ्टनंट जनरल नऱ्होना यांनी युध्दभूमीवरील आणि लष्करातील डावपेच आणि प्रशिक्षण कॉर्पोरेट जगाला का उपयुक्त ठरत आहे, यावर टिप्पणी केली. या दोन्ही क्षेत्रात उत्तम सांघिक भावनेची ( टीम बिल्डिंग) गरज असते. उत्तम टीम वर्क असेल तर उत्पादकता वाढून कंपनीचा नफाही वाढतो. युद्धभूमीवर जशी चपळता आणि वेगवान निर्णय घेण्याची आवश्यकता असते, तीच कंपन्यांचीही गरज आहे. संधीचा लाभ घेणे, परिपूर्ण नियोजन करणे आणि त्याची त्वरित अंमलबजावणी करणे, हेही दोन्ही क्षेत्रात अभिप्रेत आहे. नेतृत्वगुण विकसित करण्यावरही या क्षेत्रांचे यश अवलंबून असते.